# ३. कळो निसर्ग मानवा



- **ऐका. म्हणा. वाचा.**

येता पावसाची सर
चिंब होतेय धरणी,
परी सताविते चिंता
तरी मिळेल का पाणी.

स्वच्छ सुंदर धरती
राखायची जो-तो म्हणे,
परि ज्याला-त्याला वाटे
नेम पाळावे पराने.



नदीकाठी धरतीवर
जेथे पाहू तेथे घाण,
पर्यावरणाचे कोणा
कसे असू नये भान.

म्हणे साधला विकास
सुरू केले कारखाने,
नाही फिकीर, सोडली
पाण्यामध्ये रसायने.




पिण्यासाठी शुद्ध पाणी
साऱ्या भूमिवर असावे,
कळो निसर्ग मानवा
दिस सोनियाचे यावे.

**– सचिन बेंडभर**

---

**शब्दार्थ : चिंब होणे** – ओले होणे. **सताविणे** – त्रास देणे. **चिंता**– काळजी. **नेम** – नियम. **पराने** – दुसऱ्याने. **भान** – विचार, जाणीव. **फिकीर** – काळजी. **सोनियाचे दिस** – चांगले, भरभराटीचे दिवस.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरात आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्या.



## स्वाध्याय

**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पावसाची सर आली तरी कवीला कोणती चिंता सतावते ?

(आ) नियम कोणी पाळावेत असे प्रत्येक माणसाला वाटते ?

(इ) विकास साधताना माणसाने कोणती काळजी घेतली नाही ?

(ई) नदीकाठची घाण बघून कवीच्या काय लक्षात येते ?

**प्र. २. योग्य पर्याय निवडा.**

(१) पिण्यासाठी शुद्ध पाणी साऱ्या भूमीवर असावे -

(अ) सगळ्यांनी नळाचे पाणी प्यावे.

(आ) सगळ्यांनी फिल्टरचे पाणी प्यावे.

(इ) सगळ्यांना पिण्यासाठी शुद्ध व स्वच्छ पाणी मिळावे.

(२) कळो निसर्ग मानवा -

(अ) मानवाला निसर्ग दिसावा.

(आ) मानवाला निसर्ग समजावा.

(इ) मानवाने निसर्गाचे उपकार समजून त्याप्रमाणे वागावे.

**प्र. ३. कवितेत शेवटचे अक्षर सारखे असणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

उदा., धरणी - पाणी

**प्र. ४. खालील ठिकाणी कोणते नियम पाळावे असे तुम्हांला वाटते ?**


(अ) बसस्थानक (आ) रस्त्यावरचा सिग्नल (इ) वर्गातून मैदानावर जाताना

**प्र. ५. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा.**

उदा., रसायने - रसा, साय, सार, साने

(अ) पर्यावरण (आ) विकास (इ) राखायचा

**प्र. ६. खालील मुद्द्यांची मित्रांबरोबर चर्चा करा. शिक्षकांच्या मदतीने आणखी माहिती मिळवा.**




**प्र. ७. दैनंदिन जीवनात पाण्याचा उपयोग कशाकशासाठी होतो ते सांगा.**

**प्र. ८. पाण्याचा योग्य वापर कसा करावा यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?**

**उपक्रम :**

(१) तुमच्या परिसरातील रहिवासी पाणी कशाकशामध्ये साठवतात, ते पाणी किती दिवस ठेवतात, त्या पाण्याचा वापर कसा करतात यांविषयीची माहिती मिळवा व वहीत नोंद करा.

(२) पाणी काटकसरीने वापरावे या संदर्भातील खालील घोषवाक्ये वाचा. वहीत लिहा. किमान दोन घोषवाक्ये तयार करा.

**पाणी बचतीचे नियम पाळा,**
**पाण्याचा गैरवापर टाळा.**

**थेंब थेंब पाण्याचा,**
**अनमोल ठेवा निसर्गाचा.**

**थेंबे थेंबे तळे साचे,**
**महत्त्व ओळखा पाण्याचे.**

## खेळ खेळूया.

- **दिलेल्या आकृतीमध्ये योग्य शब्द लिहून शब्द डोंगर तयार करा.**


(१) स्वत:साठी वापरला जाणारा शब्द.

(२) दररोज सकाळी पूर्वेस उगवणारा.

(३) आपण ज्या देशात राहतो तो देश.

(४) आपण आजारी पडल्यास या ठिकाणी जातो.

(५) पक्ष्यांच्या पंखांचा आवाज.



## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेद वाचा.**

आईने राजूकडे पाहिले. राजू गाढ झोपला होता. आईला राजू कधी उठतो असे झाले होते. तेवढ्यात ताई आली. ताईने राजूला उठवले.

वरील परिच्छेदात आई, राजू, ताई हे शब्द वारंवार आले आहेत. या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला परिच्छेद वाचा.

आईने राजूकडे पाहिले. तो गाढ झोपला होता. तिला तो कधी उठतो असे झाले होते. तेवढ्यात ताई आली. तिने त्याला उठवले.

आई, राजू, ताई या नामांऐवजी आपण येथे तो, तिला, तिने, त्याला असे शब्द वापरले आहेत. या शब्दांना सर्वनाम म्हणतात.

**मी, आम्ही, तू, तुम्ही, आपण, तो, त्याचा, त्याला, त्याने, आमचा, ते, त्या, तिची ही सर्वनामे आहेत.**

- **ऐका व समजून घ्या.**

(बाबा मीनाला सायकलवर शाळेत सोडवायला निघाले होते. रस्त्याने जाणाऱ्या आजोबांची पिशवी हातातून निसटली अन् पिशवीतील सामान विखुरले. बाबांनी सायकल थांबवली. ते आजोबांजवळ गेले. मीना दोघांचे संभाषण ऐकत तिथेच उभी राहिली.)

बाबा : आजोबा, कशी काय पिशवी निसटली?

आजोबा : अहो, पिशवीचा बंद अचानक तुटला.

बाबा : अरे, अरे! थांबा, मी तुम्हांला सामान गोळा करू लागतो.

आजोबा : राहू दे. तुम्हांला जायला उशीर होईल.

बाबा : मीना, तू पण ये. अगं, वृद्ध माणसांना मदत करावी.

मीना : हो, हो. मी पण सामान गोळा करू लागते, म्हणजे आपल्याला उशीर होणार नाही.

बाबा : आजोबा केवढी जड ही पिशवी?

मीना : तुम्ही एकटे एवढी जड पिशवी कशी नेणार घरापर्यंत आणि तेही चालत चालत!

बाबा : आजोबा तुम्ही इथेच सावलीत थांबा. मी मीनाला सोडून लगेच येतो. तुम्हांलाही घरापर्यंत सोडतो.

आजोबा : कशाला उगाच तुम्हांला त्रास. मी जाईन.

बाबा : घरात दुसरे कोणी नाही का आजोबा सामान आणण्यासाठी?

आजोबा : आता घरात कोणीच नाही. सगळे कामाला गेले आहेत.

बाबा : ठीक आहे. थांबा इथे. मी आलोच.

- **वाचा**

लहान मुले भिंगातून उन्हाची किरणे कागदावर पाडतात अन् कागद पेटवतात. आगकाडीचा वापर न करता पेटलेला कागद दाखवत 'जादू, जादू' म्हणतात. खरं तर ही जादू वगैरे काही नसते. सूर्यापासून खूप उष्णता पृथ्वीवर येते. ती किरणांच्या रूपात विखुरलेली असते. ती उष्णता भिंगातून एकवटून कागद पेटतो.

सूर्यापासून मिळणारी ही प्रचंड उष्णता आपण वाया घालवत आहोत. ही वाया जाणारी उष्णता साठवून एक शक्ती निर्माण होते. सूर्याच्या या शक्तीला सौरऊर्जा म्हणतात. या सौरऊर्जेवर रस्त्यावरचे दिवे, रेडिओ, संगणक, दूरदर्शन ही यंत्रे चालू शकतात. प्रवासाची वाहनेदेखील या ऊर्जेवर पुढे जाऊ शकतात. सौरचूल, सौरबंब एवढेच नाही, तर विहिरीवरील पाण्याचे पंपदेखील या ऊर्जेवर कार्य करू शकतात.

आहे की नाही सूर्य आपला मित्र!

**शिक्षकांसाठी :** वरील प्रसंगाचे प्रकट वाचन करावे. घरी व परिसरात घडणाऱ्या अशा प्रसंगांवर विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, संवाद साधावा. त्यांना असे प्रसंग सांगण्यास व सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे.